॥ श्रीरामरक्षास्तोत्रम् ॥

(पदच्छेद-अन्वय-अर्थ-सहितम्)

रामरक्षा प्रश्नोत्तर स्पर्धेसाठी विशेष निर्मिती

प्रकाशक

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

श्रीरामरक्षास्तोत्रम्

पदच्छेद-अन्वय-अर्थ-सहितम्

निर्मिती

श्री. राजेंद्र दातार, बदलापुर

आजीवन सभासद, संस्कृतभाषासंस्था

प्रकाशक

संस्कृत भाषा संस्था

c/o Mr. Narendra Joshi,

201, Pitruchhaya, Plot No. 83,

Sakharam Keer Marg, Mahim (W),

Mumbai, India - 400 016

Website: www.sanskritbhashasanstha.in

Email: sanskritbhashasanstha@gmail.com

📞 : **+91 9833 758 745**

© सर्वाधिकार प्रकाशकांचे स्वाधीन

प्रस्तावना

श्रीरामरक्षास्तोत्र म्हणताना पदच्छेद माहीत असल्यास उच्चार योग्य होण्यास मदत होते व अन्वयार्थ जाणल्याने त्याचा उपयोगही अधिक होतो. पदच्छेद, अन्वय, व्याकरण, अर्थ, विश्लेषण, उपयोजन इ. अंगांनी रामरक्षेचा अधिक अभ्यास केला जातो. तत्पूर्वी प्राथमिक स्तरावर विशेषत: बालकांकडून पठण करून घेताना बालकांना, पालकांना आणि संस्कार वर्गातील शिक्षकांना पदच्छेद समजण्यातील व समजावण्यातील अडचणी दूर करण्याच्या केवळ मर्यादित उद्देशाने ही पुस्तिका प्रस्तुत करीत आहे.

संस्कृत लेखनात आणि विशेषत: संस्कृत काव्यलेखनात संधि करूनच लिहिण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणे पद्यान्तर्गत ङ् ,ञ् ,ण् ,न् ,म् यांचे ऐवजी मराठीतल्याप्रमाणे शीर्षबिंदू न देता ते (पर-सवर्ण) तसेच लिहिण्याची आणि वाक्यान्ती / चरणान्ती नसलेल्या पदान्तीच्या 'म्' ऐवजी शीर्षबिंदू देण्याची संस्कृत लेखनशैली आहे. त्या अनुसारच मूळ स्तोत्र भरीव ठशात छापले आहे. त्याखाली पदच्छेद, अन्वय व मराठीत अर्थ दिला आहे. पदच्छेदात समासान्तर्गत पदे '-' ने सुटी करून दाखविली आहेत. श्रीयुक्त नामे; दशरथ, रामचन्द्र, बुधकौशिक इ. व्यक्तिनामे यांतील समास-पदे मात्र सुटी केलेली नाहीत. रामरक्षेच्या शुद्धलेखनासाठी व पदच्छेद-आकलनासाठी ह्या पुस्तिकेचा उपयोग होईल.

पदान्तीच्या 'म्' ऐवजी लिहिलेल्या शीर्षबिंदूचा उच्चार श्लोक सलगपणे म्हणताना स्वभावत: पर-सवर्ण होतो व तो तसाच करण्याचा प्रयत्न करावा. (हे पर-सवर्णोच्चारण योग्य मार्गदर्शकाकडून समजावून घ्यावे.) मात्र म्हणणाऱ्याच्या इच्छेनुसार / चालीनुसार, तेथे 'विराम' असताना त्या शीर्षबिंदूचा उच्चार **'म्'** असा करणे चूक नाही.

मराठीमध्ये अकारान्त शब्दांचा अंतिम **'अ'** उच्चारात टाळण्याची प्रवृत्ती आहे. परंतु संस्कृतमध्ये तसे करू नये. संस्कृत शब्दातील **'त'**, **'राम'** शब्दातील **'म'** यांचा उच्चार पूर्ण करावा. **'कृष्ण'** शब्दातील **'ण'** ज्याप्रमाणे पूर्ण म्हटला जातो त्याचप्रमाणे **'राम'** शब्दातील **'म'** पूर्ण म्हणावा. संबोधनात **'म'** चा उच्चारणकाल लांबला तरी चालतो. (**'राम'** चे स्पेलिंग Ram असे न करता Rama असे करावे) **'हरे राम हरे राम .....'** म्हणताना बऱ्याच वेळा **'म'** चा उच्चार अर्धाच केला जातो, तो टाळून पूर्ण उच्चार करण्याचा प्रयत्न करावा.

राम: प्रभुर्मे रामं हि सेवे । रामेण दत्तं रामाय कल्पे।

गृह्णीय रामाद् रामस्य नाम । रामे रमे मां त्रायस्व राम।।

– राजेन्द्र दातार

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

।। श्रीरामरक्षास्तोत्रम् ।।

ॐ अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य बुधकौशिक ऋषिः। श्रीसीतारामचन्द्रो देवता। अनुष्टुप्छन्दः। सीता शक्तिः। श्रीमद्धनुमान् कीलकम् । श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः।

पदच्छेदः —

अस्य श्रीराम-रक्षा-स्तोत्र-मन्त्रस्य बुधकौशिकः ऋषिः। श्रीसीता-रामचन्द्रः देवता। अनुष्टुप् छन्दः। सीता शक्तिः। श्रीमत्-हनुमान् कीलकम् । श्रीरामचन्द्र-प्रीत्यर्थे जपे विनियोगः।

अन्वयः —

अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य ऋषिः बुधकौशिकः [अस्ति] । देवता श्रीसीता-रामचन्द्रः [अस्ति] । छन्दः अनुष्टुब् [अस्ति] । शक्तिः सीता [अस्ति] । श्रीमद्धनुमान् कीलकम् [अस्ति] । श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे [अस्य मन्त्रस्य] विनियोगः [अस्तु] ।

अर्थः —

ह्या श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्राचे ऋषी बुधकौशिक व देवता श्रीसीतारामचन्द्र हे असून ह्याचा छन्द अनुष्टुभ आहे. सीता ही ह्याची शक्ती व श्रीमान हनुमान हा कीलक आहे. श्रीरामचन्द्राच्या प्रीतिसाठी ह्याचा जपात विनियोग असो. (कीलक म्हणजे खिळा, मेख, कुलूप)

टिप्पनी —

■ पाठभेदः —

१. ‘ श्रीमद्धनुमान् कीलकम् ।’ ऐवजी ‘ श्रीमान् हनुमान् कीलकम् ।’

२. ‘...जपे विनियोगः।’ ऐवजी ‘...श्रीरामरक्षास्तोत्रजपे विनियोगः।’ असा पाठभेद काही प्रतींत आहे.

■ मराठीत अनुष्टुभ असे लिहितात. संस्कृत प्रातिपदिक (मूळ शब्द) **अनुष्टुभ्** असे आहे. (भ्-कारान्त स्त्रीलिङ्गी). संस्कृतात त्याचे प्रथमेचे रूप अनुष्टुप् किंवा अनुष्टुब् असे लिहितात. पुढे कठोर व्यंजन आल्यास अनुष्टुप् आणि पुढे मृदु व्यंजन किंवा स्वर आल्यास अनुष्टुब् असे लिहितात. त्यामुळे **अनुष्टुप् छन्दः** आणि **अनुष्टुब् वृत्तम्**

■ रामरक्षेतील बहुतेक श्लोक अनुष्टुप् छन्दात असल्याने रामरक्षेचा छन्द अनुष्टुप् छन्द असे म्हटले आहे.

रामरक्षेतील श्लोक क्र. १ ते १९, २१ ते २५, २७, ३१, ३४ ते ३६ व ३८ हे **अनुष्टुप्**छंदात आहेत. पहिला ध्यानाचा श्लोक व २६ व्या श्लोकाचा उत्तरार्ध **स्रग्धरा**वृत्तात आहे. श्लोक क्र. २६ चा पूर्वार्ध व श्लोक क्र. ३७ **शार्दूलविक्रीडित**वृत्तात आहे. श्लोक क्र. २० **रथोद्धता**वृत्तात आहे. श्लोक क्र. २८ व २९ हे **वसंततिलका** वृत्तात आहेत. श्लोक क्र. ३० चे वृत्त **शालिनी** हे आहे. श्लोक क्र. ३२ मध्ये **इंद्रवज्रा** वृत्त आहे व श्लोक क्र. ३३ मध्ये **उपजाति** वृत्त आहे. अशी एकूण ८ वृत्ते वापरली आहेत.

अथ ध्यानम्।

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थम् ।
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभम् ।
नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं रामचन्द्रम् ।।

(स्रग्धरावृत्तम्)

इति ध्यानम्।

पदच्छेदः —

ध्यायेत्-आ-जानु-बाहुम् धृत-शर-धनुषम् बद्ध-पद्म-आसन-स्थम्। पीतम् वासः वसानम् नव-कमल-दल-स्पर्धि-नेत्रम् प्रसन्नम् । वाम-अङ्क-आरूढ-सीता-मुख-कमल-मिलत्-लोचनम् नीर-द-आभम् । नाना-अलङ्कार-दीप्तम् दधतम् उरु-जटा-मण्डनम् रामचन्द्रम्।।

अन्वयः —

[मनुष्यः] आजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नं वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं रामचन्द्रं ध्यायेत् ।

अर्थः —

(ध्यान) ज्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत व ज्याने धनुष्यबाण धारण केले आहेत, जो बद्धपद्मासनात बसला आहे, ज्याने पिवळे वस्त्र (पीतांबर) परिधान केले आहे, ज्याचे डोळे ताज्या कमळाच्या पाकळीशी स्पर्धा करणारे (सुंदर) आहेत व जो प्रसन्न असून ज्याची दृष्टी डावीकडील आसनावर बसलेल्या सीतेच्या मुखकमलाकडे लागलेली आहे, ज्याची कांती पाणी देणाऱ्या मेघाप्रमाणे (श्यामवर्णाची) आहे, जो अनेक प्रकारच्या अलंकारांनी सुशोभित आहे, जो मोठे जटामंडन (जटा हेच भूषण) धारण करणारा आहे, त्या श्रीरामचंद्राचे (प्रांरभी) ध्यान करावे.

टिप्पनी —

- वरील सर्व वैशिष्ट्ये एकाच मूर्तीत शक्य नाहीत. ज्याला जसे जमेल, भावेल तशी मूर्ती मनश्चक्षूंपुढे आणावी असा मथितार्थ असावा.
- **पाठभेदः —** .... मण्डनं... ऐवजी.... मण्डलं...—स्वीकारार्ह आहे. जटामण्डल म्हणजे चक्राकार जटा
- **शब्दार्थाः —** वासः (वासस् नपुं.) = वस्त्र. वसानः = नेसणारा. नीर = पाणी. नीरद = पाणी देणारा, ढग. उरु = रुंद, मोठे .
- धा (३ उ.प. येथे प.प.) = ठेवणे, धारण करणे. वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण (पुं.) – दधत् . ह्याचे द्वितीया ए.व. – दधतम्

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

स्तोत्रम्

(१)

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — चरितम् रघु-नाथस्य शत-कोटि-प्रविस्तरम् । एक-एकम् अक्षरम् पुंसाम् महा-पातक-नाशनम् ।

अन्वयः — रघुनाथस्य चरितं शतकोटिप्रविस्तरम् [अस्ति] । [तस्य] एकैकम् अक्षरम् [अपि] पुंसां महापातकनाशनम् [अस्ति] ।

अर्थः — रघुनाथाचे (रामचंद्राचे) चरित्र (आचरण) शतपैलवी आहे. त्याच्या एकेका गुणाचे आचरणही मनुष्यास मोठ्या पातकापासून वाचविते.

टिप्पनी —

- येथे कोटि ह्या शब्दाचा अर्थ संख्यात्मक नसून कड, टोक, आवाका, पैलू असा घ्यावा.
- शत, सहस्र हे शब्द कित्येकदा केवळ संख्यात्मक अर्थाने न घेता पुष्कळ अशा लौकिकार्थानेही वापरले जातात.

(२)

ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम् ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — ध्यात्वा नील-उत्पल-श्यामम् रामम् राजीव-लोचनम् । जानकी-लक्ष्मण-उपेतम् जटा-मुकुट-मण्डितम्।

(३)

सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तञ्चरान्तकम् ।
स्वलीलया जगत् त्रातुमाविर्भूतमजं विभुम् ।।

[लेखनविकल्पः – ....जगत्त्रातुमाविर्भूतमजं...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — स-असि-तूण-धनुः-बाण-पाणिम् नक्तम्-चर-अन्तकम्। स्व-लीलया जगत् त्रातुम् आविर्भूतम् अ-जम् विभुम्।।

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(४)

रामरक्षां पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ।।

[लेखनविकल्पः – ....**पठेत्प्राज्ञः** ...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — रामरक्षाम् पठेत् प्राज्ञः पाप-घ्नीम् सर्व-काम-दाम् । शिरः मे राघवः पातु भालम् दशरथ-आत्म-जः ।।

अन्वयः (२), (३), (४.१) —

नीलोत्पलश्यामं राजीवलोचनं जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितं सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तञ्चरान्तकं स्वलीलया जगत् त्रातुम् आविर्भूतम् अजं विभुं रामं ध्यात्वा प्राज्ञः [मनुष्यः] पापघ्नीं सर्वकामदां रामरक्षां पठेत् ।

अर्थः (२), (३) (४.१) —

नीलकमलाप्रमाणे ज्याचा श्यामवर्ण आहे व कमलासारखे प्रफुल्ल असे ज्याचे डोळे आहेत, ज्याच्या सन्निध सीता व लक्ष्मण आहे , जटांच्या मुकुटामुळे जो सुशोभित दिसत आहे , जो खड्ग आणि बाणांचा भाता जवळ बाळगणारा आहे , ज्याच्या एका हाती धनुष्य व दुसऱ्या हाती बाण आहे, जो राक्षसांचा नाश करणारा आहे ; खरोखर जन्मरहित व व्यापक असूनही जो परमेश्वर जगाचे रक्षण करण्याकरिता स्वत:च्या लीलेने रामरूपाने अवतीर्ण झालेला आहे , अश्या रामप्रभूचे ध्यान करून पातकांचा नाश करणाऱ्या व सर्व कामना पुरविणाऱ्या ह्या रामरक्षास्तोत्राचे सुज्ञ माणसाने पठण करावे.

अन्वयः (४.२) —

राघवः मे (= मम) शिरः पातु। दशरथात्मजः [मम] भालं [पातु] ।

अर्थः (४.२) — सुविख्यात रघुराजाच्या वंशात जन्मलेला राम माझ्या मस्तकाचे रक्षण करो. दशरथाचा पुत्र राम माझ्या कपाळाचे रक्षण करो.

टिप्पनी —

- असिः च तूणः च असितूणौ। (इतरेतर-द्वन्द्वः)। असितूणाभ्यां सह वर्तते सः सासितूणः। (सह-बहुव्रीहिः)। धनुः च बाणः च धनुर्बाणौ। (इतरेतर-द्वन्द्वः)। धनुर्बाणौ यस्य पाणयोः सः धनुर्बाणपाणिः। (बहुव्रीहिः)। सासितूणः च असौ धनुर्बाणपाणिः च असौ सासितूणधनुर्बाणपाणिः , तम्। (उभयपदप्रधान-कर्मधारयः)। [असिः कुक्षौ, तूणः च पृष्ठे, वामहस्ते धनुः, दक्षिणहस्ते च बाणः इति रूप्यते।]
- **शब्दार्थाः** – उत्पल = कमळ , राजीव = कमळ , असि = तलवार , तूण = भाता , नक्त = रात्र , नक्तञ्चर = निशाचर , राक्षस

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(५)

कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रिय: श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सल:।।

(अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — कौसल्येय: दृशौ पातु विश्वामित्र-प्रिय: श्रुती। घ्राणम् पातु मख-त्राता मुखम् सौमित्रि-वत्सल:।।

अन्वय: — कौसल्येय: [मम] दृशौ पातु। विश्वामित्रप्रिय: [मम] श्रुती [पातु] । मखत्राता [मम] घ्राणं पातु । सौमित्रिवत्सल: [मम] मुखम् [पातु] ।

अर्थ: — कौसल्याराणीचा पुत्र राम माझ्या दोन्ही डोळ्यांचे रक्षण करो. विश्वामित्र ऋषींचा आवडता शिष्य असा माझा राम माझ्या दोन्ही कानांचे रक्षण करो.(विश्वामित्रांच्या) यज्ञाचे रक्षण करणारा राम माझ्या नाकाचे रक्षण करो. लक्ष्मणावर प्रेम करणारा राम माझ्या मुखाचे रक्षण करो.

टिप्पनी –

- **शब्दार्था:** – मख =यज्ञ , कौसल्येय = कौसल्येचा पुत्र = राम , सौमित्रि = सुमित्रेचा पुत्र = लक्ष्मण (लक्ष्मण आणि शत्रुघ्न दोघेही सुमित्रेचेच पुत्र. त्यामुळे शत्रुघ्न हा सुद्धा सौमित्रिच आहे.)
- राजा दशरथाला तीन राण्या होत्या. मोठी कौसल्या, दुसरी सुमित्रा व तिसरी म्हणजेच धाकटी कैकेयी. कौसल्येचा पुत्र राम. सुमित्रेचे दोन पुत्र - लक्ष्मण आणि शत्रुघ्न. कैकेयीचा पुत्र भरत.

(६)

जिह्वां विद्यानिधि: पातु कण्ठं भरतवन्दित:।
स्कन्धौ दिव्यायुध: पातु भुजौ भग्नेशकार्मुक:।।

(अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — जिह्वाम् विद्या-निधि: पातु कण्ठम् भरत-वन्दित:। स्कन्धौ दिव्य-आयुध: पातु भुजौ भग्न-ईश-कार्मुक:।।

अन्वय: — विद्यानिधि: [मम] जिह्वां पातु। भरतवन्दित: [मम] कण्ठं [पातु] । दिव्यायुध: [मम] स्कन्धौ पातु। भग्नेशकार्मुक: [मम] भुजौ [पातु] ।

अर्थ: — सर्व विद्या धारण करणारा राम माझ्या जिभेचे रक्षण करो. भरताने ज्याला वंदन केले आहे असा राम माझ्या कंठाचे रक्षण करो. दिव्य शस्त्रे बाळगणारा राम माझ्या दोन्ही खांद्यांचे रक्षण करो. ईशकार्मुक (शिवधनुष्य) मोडणारा राम माझ्या दोन्ही बाहूंचे रक्षण करो.

(७)

करौ सीतापति: पातु हृदयं जामदग्न्यजित्।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रय:।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद: — करौ सीता-पतिः पातु हृदयम् जामदग्न्य-जित् । मध्यम् पातु खर-ध्वंसी नाभिम् जाम्बवत्-आश्रय:।।

अन्वय: — सीतापतिः [मम] करौ पातु। जामदग्न्यजित् [मम] हृदयं [पातु] । खरध्वंसी [मम] मध्यं पातु । जाम्बवदाश्रयः [मम] नाभिं [पातु] ।

अर्थ: —

सीतापती राम माझ्या हातांचे रक्षण करो. परशुरामाला जिंकणारा राम माझ्या हृदयाचे रक्षण करो. खर नावाच्या राक्षसाचा नाश करणारा राम माझ्या शरीराच्या मध्यभागाचे रक्षण करो. जांबवानाला आश्रय देणारा राम माझ्या नाभीचे (बेंबीचे) रक्षण करो.

टिप्पनी —

■ जमदग्नि-ऋषींचा पुत्र म्हणजेच जामदग्न्य = परशुराम (परशुरामाचे चार भाऊ रुमण्वान् , सुहोत्र, वसु व विश्वावसु हेही शब्दशः अर्थाने जामदग्न्यच.)

(८)

सुग्रीवेश: कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभु:।
ऊरू रघूत्तम: पातु रक्ष:कुलविनाशकृत्।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद: — सुग्रीव-ईशः कटी पातु सक्थिनी हनुमत्-प्रभु:। ऊरू रघु-उत्तमः पातु रक्षः-कुल-विनाश-कृत्।।

अन्वय: — सुग्रीवेशः [मम] कटी पातु । हनुमत्प्रभुः [मम] सक्थिनी [पातु] । रक्षःकुलविनाश-कृत् रघूत्तमः [मम] ऊरू पातु ।

अर्थ: —

सुग्रीवाचा स्वामी राम माझ्या दोन्ही कटींचे (वरील कमरेचे) रक्षण करो. हनुमंताचा प्रभु राम माझ्या दोन्ही सक्थिनींचे (खालील कमरेचे) रक्षण करो. राक्षसकुलाचा विनाश करणारा रघुकुलश्रेष्ठ राम माझ्या ऊरूंचे (मांड्यांचे) रक्षण करो.

टिप्पनी —

■ **पाठभेद:** - सुग्रीवेशः कटिं पातु..

(९)

जानुनी सेतुकृत्पातु जङ्घे दशमुखान्तकः।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः।।

[लेखनविकल्पः — ....**सेतुकृत् पातु** ...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — जानुनी सेतु-कृत् पातु जङ्घे दश-मुख-अन्तकः। पादौ बिभीषण-श्री-दः पातु रामः अखिलम् वपुः।।

अन्वयः — सेतुकृत् [मम] जानुनी पातु । दशमुखान्तकः [मम] जङ्घे [पातु] । बिभीषणश्रीदः [मम] पादौ पातु । रामः [मम] अखिलं वपुः [पातु] ।

अर्थः —

समुद्रावर सेतु बांधणारा राम माझ्या दोन्ही जानूंचे (गुडघ्यांचे) रक्षण करो. दशमुखी रावणाचा नाश करणारा राम माझ्या दोन्ही जंघांचे (पायांच्या पोटऱ्यांचे) रक्षण करो. बिभीषणाला राजलक्ष्मी देणारा राम माझ्या दोन्ही पावलांचे रक्षण करो आणि सर्वांना आनंद देणारा श्रीराम माझ्या सर्व शरीराचे रक्षण करो.

(१०)

एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — एताम् राम-बल-उपेताम् रक्षाम् यः सु-कृती पठेत् । सः चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ।।

अन्वयः - यः सुकृती एतां रामबलोपेतां रक्षां पठेत् ; सः चिरायुः , सुखी , पुत्री , विजयी , विनयी भवेत्।

अर्थः — **(फलश्रुति)** —

ह्याप्रमाणे रामाच्या सामर्थ्याने युक्त असलेल्या ह्या रामरक्षेचे जो पुण्यवान् मनुष्य पठण करील; तो दीर्घायुषी, सुखी, पुत्रवान् , सर्व कार्यात विजय मिळवणारा आणि विनयसंपन्न असा होईल.

टिप्पनी —

- रामरक्षा = रामबलोपेता रक्षा. मध्यमपदलोपी कर्मधारय समास.
- सुकृती = सुकृतं वर्तते यस्य सः। (सत्कर्म केलेला /करणारा, पुण्यवान्), प्रातिपदिक (मूळ शब्द)- सुकृतिन्. सुखी , पुत्री , विजयी , विनयी ह्या शब्दांचेही मूळ शब्द सुखिन् , पुत्रिन् , विजयिन् , विनयिन् असे इन् -अन्त आहेत.

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(११)

पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिण: ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभि: ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद: — पाताल-भूतल-व्योम-चारिण: छद्म-चारिण: । न द्रष्टुम् अपि शक्ता: ते रक्षितम् राम-नामभि: ।।

अन्वय: — [ये] पातालभूतलव्योमचारिण: छद्मचारिण:, ते रामनामभि: रक्षितं [मनुष्यं] द्रष्टुम् अपि शक्ता: न [भवन्ति] ।

अर्थ: — ह्या रामनामांनी रक्षण केलेल्या मनुष्याला पाताळ, भूमी किंवा आकाशात संचार करणारे कपटी लोक डोळ्यांनी पाहूही शकत नाहीत.

टिप्पनी —

- व्योम = आकाश , छद्म = कपटी, फसवा

(१२)

रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन् ।
नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद: — राम इति रामभद्र इति रामचन्द्र इति वा स्मरन् । नर: न लिप्यते पापै: भुक्तिम् मुक्तिम् च विन्दति ।।

अन्वय: — राम इति रामभद्र इति रामचन्द्र इति वा स्मरन् नर: पापै: न लिप्यते। [स: नर:] भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।

अर्थ: — राम, रामभद्र किंवा रामचंद्र अशा नावांनी श्रीरामाचे स्मरण करणारा माणूस पापांनी लिप्त न होता अनेक सुखोपभोग मिळवून शेवटी मोक्ष मिळवतो.

(१३)

जगज्जैत्रैकमन्त्रेण रामनाम्नाभिरक्षितम् ।
य: कण्ठे धारयेत् तस्य करस्था: सर्वसिद्धय: ।।

[लेखनविकल्प: – ....**धारयेत्तस्य** ...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद: — जगत्-जैत्र-एक-मन्त्रेण राम-नाम्ना अभिरक्षितम् । य: कण्ठे धारयेत् तस्य कर-स्था: सर्व-सिद्धय: ।।

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

अन्वय : — रामनाम्ना जगज्जैत्रैकमन्त्रेण अभिरक्षितम् [रक्षासूत्रादिकं] यः कण्ठे धारयेत् , तस्य करस्थाः सर्वसिद्धयः [भवेयुः] ।

अर्थ : —

सर्व जगाला जिंकणारा मुख्य मंत्र जो रामनाम , त्या मंत्राने अभिरक्षित –मंतरलेला पदार्थ (ताईत, इ.) जो आपल्या गळ्यात धारण करतो , त्याला सर्व सिद्धी सहज हस्तगत होतात.

(१४)

वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत् ।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम् ।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेद : — वज्र-पञ्जर-नाम इदम् यः राम-कवचम् स्मरेत् । अव्याहत-आज्ञः सर्वत्र लभते जय-मङ्गलम् ।।

अन्वय : — वज्रपञ्जरनाम इदं रामकवचं यः स्मरेत् , [सः] अव्याहताज्ञः [भवेत्] । [सः] सर्वत्र जयमङ्गलं लभते ।

अर्थ : —

इंद्राच्या वज्राचा पिंजरा जसा अत्यंत संरक्षक, तसे हे रामकवच –रामरक्षास्तोत्र असल्यामुळे यालाही वज्रपंजर असे नाव आहे. याचे स्मरण करतो, त्याची आज्ञा अबाधित मानली जाते आणि तो सर्वत्र जय मिळवून कल्याण साधतो.

(१५)

आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः।
तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः।।

[लेखनविकल्पः – ....**आदिष्टवान्यथा** ...] (अनुष्टुप् छन्दः)

[लेखनविकल्पः – ....**लिखितवान्प्रातः** ...]

पदच्छेद : — आदिष्टवान् यथा स्वप्ने राम-रक्षाम् इमाम् हरः। तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धः बुधकौशिकः।।

अन्वय : — हरः (= शङ्करः) इमां रामरक्षां [बुधकौशिकस्य] स्वप्ने यथा आदिष्टवान् , प्रातः प्रबुद्धः बुधकौशिकः तथा लिखितवान् ।

अर्थ : — अशी ही रामरक्षा भगवान शंकरांनी बुधकौशिक ऋषींना स्वप्नात जशी सांगितली, तशीच सकाळी जागे झाल्यावर त्यांनी लिहून ठेवली.

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(१६)

आराम: कल्पवृक्षाणां विराम: सकलापदाम् ।
अभिरामस्त्रिलोकानां राम: श्रीमान् स न: प्रभु:।।

[लेखनविकल्प: – ....**श्रीमान्स** ...] (अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — आराम: कल्प-वृक्षाणाम् विराम: सकल-आपदाम् । अभिराम: त्रि-लोकानाम् राम: श्रीमान् स: न: प्रभु:।।

अन्वय: — कल्पवृक्षाणाम् आराम: , सकलापदां विराम: , त्रिलोकानाम् अभिराम: , स: श्रीमान् राम: न: (= अस्माकं) प्रभु:।

अर्थ: — श्रीराम हा कल्पवृक्षांचा जणू सुंदर बगीचाच आहे. सर्व आपत्ती घालविणारा व त्रिलोकात मनोहर असा तो श्रीमान राम आमचा प्रभू आहे.

(१७)

तरुणौ रूपसम्पन्नौ सुकुमारौ महाबलौ।
पुण्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ।।

(अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — तरुणौ रूप-सम्पन्नौ सु-कुमारौ महा-बलौ । पुण्डरीक-विशाल-अक्षौ चीर-कृष्ण-अजिन-अम्बरौ।।

(१८)

फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ।।

(अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — फल–मूल-आशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्म-चारिणौ। पुत्रौ दशरथस्य एतौ भ्रातरौ राम-लक्ष्मणौ।।

(१९)

शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् ।
रक्ष:कुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ।।

(अनुष्टुप् छन्द:)

पदच्छेद: — शरण्यौ सर्व-सत्त्वानाम् श्रेष्ठौ सर्व-धनुष्मताम् । रक्ष:-कुल-निहन्तारौ त्रायेताम् न: रघु-उत्तमौ ।।

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

अन्वय: (१७) (१८) व (१९) —

तरुणौ रूपसम्पन्नौ सुकुमारौ महाबलौ पुण्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ दशरथस्य एतौ पुत्रौ रामलक्ष्मणौ भ्रातरौ सर्वसत्त्वानां शरण्यौ सर्वधनुष्मतां श्रेष्ठौ रक्षःकुलनिहन्तारौ रघूत्तमौ नः (= अस्मान्) त्रायेताम् ।

अर्थ: (१७) (१८) व (१९) —

वयाने तरुण , रूपवान् , सुकुमार , अतिशय बलवान , कमलदलाप्रमाणे विस्तृत नेत्र असलेले, वल्कले आणि कृष्णाजिन हीच वस्त्रांप्रमाणे परिधान करणारे , कंदमूलफले भक्षण करणारे , जितेंद्रिय, तपस्वी , ब्रह्मचारी , सर्व प्राण्यांचे रक्षण करणारे , सर्व धनुर्धरांमध्ये श्रेष्ठ , राक्षसांच्या कुलाचा संहार करणारे व रघुकुलांतील प्रमुख असे दशरथाचे पुत्र , राम-लक्ष्मण हे दोघे बंधू आमचे रक्षण करोत.

टिप्पनी —

- दान्तौ — दम् (दाम्यति) (४ प.प.) = दमन करणे, उपशम करणे, इन्द्रियनिग्रह करणे ह्या धातूचे भूतकालवाचक धातुसाधित **दान्त** = इन्द्रियनिग्रह केलेला, जितेन्द्रिय. दान्त शब्दाचे पुं. प्रथमा द्विवचन = दान्तौ .

(२०)

आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ ।
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ।।

(रथोद्धतावृत्तम्)

पदच्छेद: — आत्त-सज्ज-धनुषौ इषु-स्पृशौ अक्षय-आशु-ग-निषङ्ग-सङ्गिनौ । रक्षणाय मम राम-लक्ष्मणौ अग्रतः पथि सदा एव गच्छताम्।।

अन्वय: — आत्तसज्जधनुषौ इषुस्पृशौ अक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ रामलक्ष्मणौ मम रक्षणाय अग्रतः पथि सदा एव गच्छताम् ।

अर्थ: —

सज्ज धनुष्ये धारण करणारे, बाणांना हस्तस्पर्श करणारे, व अक्षय्य बाणांचे भाते बाळगणारे राम-लक्ष्मण माझ्या रक्षणाकरितां मार्गामध्ये नेहमीच पुढे चालोत.

टिप्पनी —

- आ + दा = घेणे. त्याचे भूतकाळी विशेषण आदत्त = घेतलेले. त्याचेच लघुरूप आत्त. आदत्त = आत्त.
- **शब्दार्था**: — पुण्डरीक = (पांढरे) कमळ ; इषु = बाण आशु जलद, लगेचच ;
  आशुग = लगेच/लवकर/जलद जाणारा = बाण ; निषङ्ग = भाता (बाणांचा)

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(२१)

सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा।
गच्छन्मनोरथान् नश्च रामः पातु सलक्ष्मणः।।

[लेखनविकल्पः — ....**गच्छन्मनोरथान्नश्च**/ ...**गच्छन्मनोरथान्नश्च** ...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः (प्रथमप्रकारः) — सन्नद्धः कवची खड्गी चाप-बाण-धरः युवा। गच्छन् मनोरथान् नः च रामः पातु स-लक्ष्मणः।।

अन्वयः — सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरः युवा सलक्ष्मणः गच्छन् रामः नः (= अस्माकं) मनोरथान् च पातु ।

अर्थः — निरंतर सज्ज असलेला, अंगात कवच (चिलखत) घातलेला, हाती खड्ग आणि धनुष्यबाण धारण करणारा, लक्ष्मणासह चालत असणारा तरुण राम आमच्या मनोरथांचे रक्षण करो.

पदच्छेदः (द्वितीयप्रकारः) — सन्नद्धः कवची खड्गी चाप-बाण-धरः युवा। गच्छन्मनोरथान् नः च रामः पातु स-लक्ष्मणः।।

अन्वयः — सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरः युवा सलक्ष्मणः रामः नः (=अस्माकं) गच्छन्मनोरथान् च पातु।

अर्थः — निरंतर सज्ज असलेला, अंगात कवच (चिलखत) घातलेला, हाती खड्ग आणि धनुष्यबाण धारण करणारा, लक्ष्मणासह असणारा तरुण राम आमच्या चंचल मनोरथांचे रक्षण करो.)

टिप्पनी — **वरील प्रस्तुत पाठ हा गीता प्रेस, गोरखपूर यांच्या प्रतीतील आहे.**

■ **पाठभेदः (१) गच्छन्मनो ऽरथो ऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः।**

पदच्छेदः (प्रथमप्रकारः) — गच्छत्-मनः (किंवा गच्छन् मनः) अरथः अस्माकम् रामः पातु स-लक्ष्मणः।

अन्वयः — अरथः स-लक्ष्मणः रामः अस्माकं गच्छत्-मनः पातु ।

अर्थः — रथ नसणारा, लक्ष्मणासह असलेला राम आमच्या चंचल मनाचे रक्षण करो.

पदच्छेदः (द्वितीयप्रकारः) — गच्छन् मनः अरथः अस्माकम् रामः पातु स-लक्ष्मणः।

अन्वयः — अरथः गच्छन् स-लक्ष्मणः रामः अस्माकं मनः पातु ।

अर्थः — रथ नसणारा, लक्ष्मणासह गमन करणारा राम आमच्या मनाचे रक्षण करो.

(हा पाठभेद ग्राह्य वाटतो.) [**अस्माकं** चा अन्वय **मन** ह्या शब्दाऐवजी **राम** शीही लावता येईल.]

[**अस्माकं** चा अन्वय **मन** ह्या शब्दाऐवजी **राम** शीही लावता येईल.]

पाठभेदः (२) गच्छन् मनोरथो ऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः।

पदच्छेदः — गच्छन् मनोरथः अस्माकम् रामः पातु स-लक्ष्मणः।

अन्वयः — स-लक्ष्मणः गच्छन् अस्माकं मनोरथः रामः पातु ।

अर्थः — लक्ष्मणासह जाणारा, आमचे मनोरथच असा राम रक्षण करो. (कोणाचे ? तर आमचे असे अध्याहृत घ्यावे लागेल. मनोरथ हा शब्द संस्कृतात पुंलिङ्गी आहे. येथे कर्मपदाचा अभाव असल्याने रचना अर्थपूर्ण वाटत नाही.

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(२२)

रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली।

काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः —

रामः दाशरथिः शूरः लक्ष्मण-अनुचरः बली। काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयः रघु-उत्तमः।।

(२३)

वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः।

जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः —

वेद-अन्त-वेद्यः यज्ञ-ईशः पुराण-पुरुष-उत्तमः। जानकी-वल्लभः श्रीमान् अ-प्रमेय-पराक्रमः।।

(२४)

इत्येतानि जपन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः।

अश्वमेधाधिकं पुण्यं सम्प्राप्नोति न संशयः।।

[लेखनविकल्पः — ....**जपन् नित्यं** ...] (अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — इति एतानि जपन् नित्यम् मद्-भक्तः श्रद्धया अन्वितः। अश्व-मेध-अधिकम् पुण्यम् सम्-प्राप्नोति न संशयः।।

अन्वयः (२२), (२३) (२४) —

दाशरथिः , शूरः , लक्ष्मणानुचरः , बली , काकुत्स्थः , पुरुषः , पूर्णः , कौसल्येयः , रघूत्तमः , वेदान्तवेद्यः , यज्ञेशः , पुराणपुरुषोत्तमः , जानकीवल्लभः , श्रीमान् , अप्रमेयपराक्रमः , रामः इति एतानि [नामानि] नित्यं जपन् श्रद्धया अन्वितः मद्भक्तः अश्वमेधाधिकं पुण्यं सम्प्राप्नोति। [अस्मिन्] न संशयः।

अर्थः (२२), (२३) (२४) —

आनंद देणारा, दशरथाचा पुत्र, शूर लक्ष्मण ज्याचा सेवक आहे असा बलवान, ककुत्स्थकुलोत्पन्न, महापुरुष, पूर्णब्रह्म, कौसल्यातनय, रघूत्तम, वेदांतशास्त्राने ज्ञेय, यज्ञांचा स्वामी, पुराणपुरुषोत्तम, जानकीचा प्रिय, वैभवशाली, अगणित पराक्रम करणारा अशा ह्या नावांचा श्रद्धापूर्वक नेहमी जप करणाऱ्या माझ्या भक्ताला अश्वमेध यज्ञाच्या पुण्याहून अधिक पुण्य लाभते, यात संशय नाही. (असे शंकराचे अभिवचन आहे.)

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

टिप्पनी —

■ इक्ष्वाकु-वंशातच पुढे ककुत्स्थ राजा झाला. त्याच वंशात पुढे प्रसिद्ध रघु राजा झाला. त्याचा वंश तो रघुवंश. त्याच वंशातील दशरथाचा पुत्र श्रीराम. त्यामुळे ककुत्स्थाचा वंशज ह्या अर्थी राम **काकुत्स्थ** आहे. रघुवंशातील ह्या अर्थी **राघव** आहे. रघुकुळातील उत्तम ह्या अर्थी **रघूत्तम** , रघुकुलश्रेष्ठ ह्या अर्थी **रघुवर** आहे. रघुवंशातील नाथ, नायक ह्या अर्थी **रघुवंशनाथ / रघुनाथ** आहे. रघुकुलाला आनन्द देणारा किंवा रघुकुलातील पुत्र ह्या अर्थी **रघुनन्दन** आहे. रामासाठी अशी वेगवेगळी विशेषणे रामरक्षेत योजिली आहेत.

(२५)

रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम्।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नराः।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — रामम् दूर्वा-दल-श्यामम् पद्म-अक्षम् पीत-वाससम् । स्तुवन्ति नामभिः दिव्यैः न ते संसारिणः नराः।।

अन्वयः — रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् इति दिव्यैः नामभिः [ये] स्तुवन्ति ते नराः संसारिणः न [भवेयुः] ।

अर्थः — दूर्वादलाप्रमाणे श्यामवर्णाचा, कमळाप्रमाणे नेत्र असणारा आणि पीतांबर परिधान करणारा असा जो राम, त्याची दिव्य नावांनी जे मनुष्य स्तुति करतात, ते जन्ममरणाच्या संसारातून सुटतात.

टिप्पनी —

■ पाठभेदः — नराः ऐवजी नरः — ग्राह्य आहे कारण नृ (माणूस) चे प्रथमा बहुवचन नरः. त्यामुळे अर्थात पडत नाही.

(२६)

रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुन्दरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।

(शार्दूलविक्रीडितवृत्तम्)

राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिम् ।
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ।।

(स्रग्धरावृत्तम्)

पदच्छेदः — रामम् लक्ष्मण-पूर्व-जम् रघु-वरम् सीता-पतिम् सुन्दरम् । काकुत्स्थं करुणा-अर्णवम् गुण-निधिम् विप्र-प्रियम् धार्मिकम् । राज-इन्द्रम् सत्य-सन्धम् दशरथ-तनयम् श्यामलम् शान्त-मूर्तिम् । वन्दे लोक-अभिरामम् रघु-कुल-तिलकम् राघवम् रावण-अरिम्।।

अन्वयः — [अहं] लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुन्दरं काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकं राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिं लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिं रामं वन्दे ।

अर्थः — लक्ष्मणाचा श्रेष्ठ भ्राता, रघुकुलश्रेष्ठ, सीतेचा पती, सुंदर, ककुत्स्थकुलोत्पन्न, दयासागर, सदगुणांचा निधी, ब्राह्मण ज्याला प्रिय आहेत असा, धार्मिक, राजेंद्र, सत्यप्रतिज्ञ, दशरथपुत्र, सावळ्या वर्णाचा, शांतमूर्ती, लोकांना आनंद देणारा, रघुकुलाला तिलकाप्रमाणे शोभणारा आणि रावणाचा शत्रू जो राघव श्रीराम, त्याला मी वंदन करतो.

(२७)

रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे। रघु-नाथाय नाथाय सीतायाः पतये नमः।।

अन्वयः — रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः।

अर्थः — राम , रामभद्र , रामचंद्र , वेधा , रघुनाथ , नाथ अशी ज्याची नावे आहेत त्या सीतापतीला माझा नमस्कार असो.

टिप्पनी —

■ वेधस् (पुं.) (सृष्टिकर्ता, ब्रह्मा, सूर्य, विष्णु, पण्डित,) चे चतुर्थी ए.व. — वेधसे ; प्रथमा ए.व. — वेधा

(२८)

श्रीराम राम रघुनन्दन राम राम। श्रीराम राम भरताग्रज राम राम।
श्रीराम राम रणकर्कश राम राम। श्रीराम राम शरणं भव राम राम।।

(वसन्ततिलकावृत्तम्)

पदच्छेदः — श्रीराम राम रघु-नन्दन राम राम । श्रीराम राम भरत-अग्रज राम राम। श्रीराम राम रण-कर्कश राम राम । श्रीराम राम शरणम् भव राम राम।।

अन्वयः — [हे] श्रीराम, राम, रघुनन्दन, राम, राम, श्रीराम, राम, भरताग्रज, राम, राम , श्रीराम, राम, रणकर्कश , राम , राम, श्रीराम , राम , राम , राम [मम] शरणं (= शरणस्थानं) भव।

अर्थः — हे श्रीरामा, रामा ! हे रघुनंदना रामा, रामा !
हे श्रीरामा, रामा ! हे भरताच्या अग्रजा रामा, रामा !
हे श्रीरामा, रामा ! हे रणांगणांत कठोर असणाऱ्या रामा, रामा !
हे श्रीरामा, रामा ! तू आमचा रक्षणकर्ता हो ! हे रामा ! हे रामा !

(२९)

श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि । श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि । श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ।।

(वसन्ततिलकावृत्तम्)

पदच्छेदः — श्रीरामचन्द्र-चरणौ मनसा स्मरामि । श्रीरामचन्द्र-चरणौ वचसा गृणामि । श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि । श्रीरामचन्द्र-चरणौ शरणम् प्रपद्ये ।।

अन्वयः — [अहं] श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि। [अहं] श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि। [अहं] श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि। [अहं] श्रीरामचन्द्र-चरणौ शरणं प्रपद्ये।

अर्थः — मी श्रीरामचंद्र-चरणांना मनाने स्मरतो. मी श्रीरामचंद्र-चरणांना वाणीने स्तवितो. मी श्रीरामचंद्र-चरणांना मस्तकाने नमितो. मी श्रीरामचंद्राच्या चरणी शरण आलो आहे.

टिप्पनी —

■ गृणामि — धातु गॄ [गृ] (९ प.प.) स्तवन करणे, वर्णन करणे

(३०)

माता रामो मत्पिता रामचन्द्रः स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः।
सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुर् नान्यं जाने नैव जाने न जाने ।।

(शालिनीवृत्तम्)

पदच्छेदः — माता रामः मत्-पिता रामचन्द्रः। स्वामी रामः मत्-सखा रामचन्द्रः। सर्वस्वम् मे रामचन्द्रः दयालुः न अन्यम् जाने न एव जाने न जाने।।

अन्वयः — [मम] माता रामः। मत्पिता रामचन्द्रः। [मम] स्वामी रामः। मत्सखा रामचन्द्रः। मे (मम) सर्वस्वं दयालुः रामचन्द्रः। [अहं] अन्यं न जाने। [अहं] न एव जाने। [अहं] न जाने।

अर्थः — माझी माता रामचंद्र आहे. माझा पिता रामचंद्र आहे. माझा स्वामी रामचंद्र आहे. माझा सखा रामचंद्र आहे. हा दयाळू रामचंद्र माझे सर्वस्व आहे. दुसऱ्या कोणास मी जाणत नाही; अगदी जाणत नाही.

(३१)

दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे च जनकात्मजा।
पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम्।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — दक्षिणे लक्ष्मणः यस्य वामे च जनक-आत्म-जा। पुरतः मारुतिः यस्य तम् वन्दे रघु-नन्दनम्।।

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

अन्वयः — यस्य दक्षिणे लक्ष्मणः , वामे च जनकात्मजा , यस्य पुरतः मारुतिः , तं रघुनन्दनम् [अहं] वन्दे।

अर्थ : — ज्याच्या उजव्या बाजूला लक्ष्मण आहे आणि डाव्या बाजूला जनकतनया (सीता) आहे व ज्याच्यापुढे मारुती आहे, त्या रघुनंदनाला मी वंदितो.

टिप्पनी — ■ पाठभेदः — ... **वामे तु जनकात्मजा।** .... ग्राह्य आहे.

(३२)

लोकाभिरामं रणरङ्गधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम्।
कारुण्यरूपं करुणाकरं तं श्रीरामचन्द्रं शरणं प्रपद्ये।।

(इन्द्रवज्रावृत्तम्)

पदच्छेदः — लोक-अभि-रामम् रण-रङ्ग-धीरम् राजीव-नेत्रम् रघु-वंश-नाथम् । कारुण्य-रूपम् करुणा-आकरम् तम् श्रीराम-चन्द्रम् शरणम् प्रपद्ये।।

अन्वयः — तं लोकाभिरामं रणरङ्गधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथं कारुण्यरूपं करुणाकरं श्रीरामचन्द्रम् [अहं] शरणं प्रपद्ये।

अर्थ : — लोकांना आनंद देणारा, रणांगणात धैर्य धरणारा, कमलाप्रमाणे नेत्र असलेला, रघुवंशाचा अधिपती व दयेची मूर्ती असा जो करुणासागर श्रीरामचंद्र त्याला मी शरण आलो आहे.

(३३)

मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।

(उपजातिवृत्तम्)

पदच्छेदः — मनोजवम् मारुत-तुल्य-वेगम् 'जित-इन्द्रियम्' बुद्धिमताम् वरिष्ठम् । वात-आत्म-जम् वानर-यूथ-मुख्यम् श्रीराम-दूतम् शरणम् प्रपद्ये।।

अन्वयः — मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठं वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतम् [अहं] शरणं प्रपद्ये।

अर्थ : — (मारुतिस्तुति) मनाप्रमाणे वेगाने गमन करणारा , वाऱ्याप्रमाणे वेगवान , आपली इंद्रिये जिंकून स्वाधीन ठेवणारा , बुद्धिमंतांत श्रेष्ठ आणि वानरसमुदायाचा मुख्य अश्या वायुपुत्र श्रीरामदूतास मी शरण आलो आहे.

टिप्पनी —

■ **शब्दार्थाः** — जव = वेग , मनः इव वेगः यस्य सः मनोजवः। मनाप्रमाणे ज्याचा वेग आहे तो मनोजव.
यूथ = कळप , समूह , समुदाय

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(३४)

कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम्।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम्।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — कूजन्तम् राम राम इति मधुरम् मधुर-अक्षरम् । आरुह्य कविता-शाखाम् वन्दे वाल्मीकि-कोकिलम्।।

अन्वयः — कविताशाखां आरुह्य राम राम इति मधुरं मधुराक्षरं कूजन्तं वाल्मीकिकोकिलम् [अहं] वन्दे।

अर्थः — (वाल्मीकिवंदन) कवितेच्या फांदीवर बसून, 'राम, राम' अश्या मधुर अक्षरांचे मधुर कूजन करणाऱ्या वाल्मीकिरूपी कोकिळपक्ष्यास मी वंदन करतो.

(३५)

आपदामपहर्तारं दातारं सर्वसम्पदाम्।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम्।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — आपदाम् अपहर्तारम् दातारम् सर्व-सम्पदाम् । लोक-अभिरामम् श्रीरामम् भूयः भूयः नमामि अहम्।।

अन्वयः — आपदाम् अपहर्तारं सर्वसम्पदां दातारं लोकाभिरामं श्रीरामं अहं भूयः भूयः नमामि।

अर्थः — (रामवंदन) आपत्तींचा नाश करणारा, सर्व संपत्ति देणारा, व लोकांना आनंद देणारा, असा जो श्रीराम त्याला मी पुनः पुनः नमस्कार करतो.

(३६)

भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसम्पदाम्।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम्।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः — भर्जनम् भव-बीजानाम् अर्जनम् सुख-सम्पदाम् । तर्जनम् यम-दूतानाम् राम राम इति गर्जनम्।।

अन्वयः — भवबीजानां भर्जनं सुखसम्पदाम् अर्जनं यमदूतानां तर्जनम् [अस्ति] राम राम इति गर्जनम्।

अर्थः — राम, राम अशी रामनामाची गर्जना ही संसाराची बीजे भर्जन करणारी(भाजून टाकणारी), सुखसंपत्तीचे अर्जन (प्राप्ती) करणारी, आणि यमाच्या दूतांना तर्जन (भय) करणारी अशी आहे.

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(३७)

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे।

रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः।

रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम्।

रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर।।

(शार्दूलविक्रीडितवृत्तम्)

पदच्छेदः —

रामः राजमणिः सदा विजयते **रामम्** रमा-ईशम् भजे।

रामेण अभिहता निशा-चर-चमूः **रामाय** तस्मै नमः।।

रामात् न अस्ति परायणम् परतरम् **रामस्य** दासः अस्मि अहम्।

रामे चित्त-लयः सदा भवतु मे भोः **राम** माम् उद्धर।।

अन्वयः —

रामो राजमणिः सदा विजयते। [अहं] रामं रमेशं भजे।

रामेण निशाचरचमूः अभिहताः। तस्मै रामाय नमः।

रामात् परायणं परतरं न अस्ति। अहं रामस्य दासः अस्मि।

मे (= मम) चित्तलयः सदा रामे भवतु। भो राम, माम् उद्धर।

अर्थः —

राजश्रेष्ठ 'राम' नेहमी विजय पावतो. त्या रमेच्या (सीतेच्या) पतीस ('रामास') मी भजतो.
'रामाने' राक्षसांची सैन्ये मारली. त्या 'रामाला' माझा नमस्कार असो.
मला 'रामाहून' दुसरा कोणी श्रेष्ठ नाही. मी 'रामाचा' दास आहे.
माझ्या चित्ताचा लय नेहमी 'रामात (रामाच्या ठायी)' होवो. हे 'रामा', माझा तू उद्धार कर!

टिप्पनी —

■ निशाचरचमूः + रामाय = निशाचरचमू रामाय [विसर्गापुढे र् असेल आणि विसर्गामागे अ, आ खेरीज इतर स्वर असेल तर त्या विसर्गाचा लोप होतो व मागील स्वर ह्रस्व असल्यास दीर्घ होतो, दीर्घ असल्यास दीर्घच राहतो. हा विसर्गलोप-सन्धि झाल्यावर पुन्हा ते शब्द जोडून लिहू नयेत.]

■ **राम** शब्दाची आठ एकवचनी विभक्तिरूपे प्रथमा ते सम्बोधन ह्या क्रमाने ह्या श्लोकात आली आहेत. —

रामः (प्रथमा), **रामम्** (द्वितीया), **रामेण** (तृतीया), **रामाय** (चतुर्थी),
रामात् (पञ्चमी), **रामस्य** (षष्ठी), **रामे** (सप्तमी), **राम** (सम्बोधनम्).

संस्कृत भाषा संस्था, मुंबई

(३८)

राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे।

सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने।।

(अनुष्टुप् छन्दः)

पदच्छेदः —

राम राम इति राम इति रमे रामे मनोरमे। सहस्र-नाम तत् तुल्यम् रामनाम वर-आनने।।

अन्वयः —

[हे] वरानने , राम राम इति राम इति [ध्यायन् / ब्रुवन्] मनोरमे रामे [अहं] रमे। [विष्णोः] सहस्रनाम [यद् अस्ति] , तत्तुल्यं रामनाम [अस्ति] ।

अर्थः —

(शिव पार्वतीला सांगतात) - हे सुवदने, राम, राम, राम, अश्या नामोच्चाराने मी मनाला आनंद देणाऱ्या रामाच्या ठायी रममाण होतो. ते (श्रीरामाचे नाव) (विष्णूच्या) सहस्रनामाशी बरोबरी करणारे आहे.

टिप्पनी —

- वरम् आननं यस्याः सा वरानना , तत्सम्बोधने वरानने (हे शङ्कर पार्वतीला सांगत आहेत.)
- **सहस्रनाम तत्तुल्यं**.........येथे **स्र (स्र)** चा उच्चार व लेखन चुकून **स्त्र / स्त्र (स्त्र)** असे केले जाते ते टाळावे.

इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं सम्पूर्णम्।

श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु।।

पदच्छेदः — इति श्रीबुधकौशिक-विरचितम् श्रीरामरक्षा-स्तोत्रम् सम्पूर्णम् ।
श्रीसीता-रामचन्द्र-अर्पणम् अस्तु।।

अर्थः — याप्रमाणे बुधकौशिक ऋषींनी रचलेले श्रीरामरक्षास्तोत्र समाप्त झाले.
ते श्रीसीता-रामचंद्रांना अर्पण असो.

— ।। शुभं भूयात् ।। —

श्लोक क्र. ३, ४, ९, १३, १५, १६, २१ व २४ मध्ये लेखनविकल्प दाखविला आहे. त्याप्रमाणे काही ठिकाणी लिहिलेले आढळते. तेथे दोन शब्द जोडून केवळ जागा वाचविली जाते. तेथे कोणतेही सन्धिकार्य वा समास नाही. तोडून लिहिणे आकलनास सुलभ आहे.

प्रकाशने

संस्कृत भाषा संस्था, मुंबई


संस्कृत-भाषा-दर्पण:।
(बाल–बोध– संस्कृतम्)
(प्राथमिक–शालांत संस्कृत– भाषा–स्पर्धा–परीक्षोपयोगि–पुस्तक)
(A mirror to see Sanskrit words in yours mother tongue.)
(इथे पहा, मातृभाषेत ८५% शब्द संस्कृत शब्दच आणि
संस्कृतोद्भव शब्दच आहेत.)
प्रथम: भाग:।
लेखक:
कै. गणेश वासुदेव करंदीकर


संस्कृत-भाषा-दर्पण:।
(बाल–बोध– संस्कृतम्)
(प्राथमिक–शालांत संस्कृत– भाषा–स्पर्धा–परीक्षोपयोगि–पुस्तक)
(A mirror to see Sanskrit words in yours mother tongue.)
(इथे पहा, मातृभाषेत ८५% शब्द संस्कृत शब्दच आणि
संस्कृतोद्भव शब्दच आहेत.)
द्वितीय: भाग:।
लेखक:
कै. गणेश वासुदेव करंदीकर


संस्कृतभाषापरिचय:।
(केवळ ७२ तासांत संस्कृत भाषा शिका)
ग. वा. करंदीकर


प्राथमिक–शालान्त–संस्कृतभाषा–स्पर्धा–परीक्षा।
संस्कृतभाषासंस्था–आयोजिता ।
प्रश्नोत्तर-
सङ्ग्रह:।
१) संस्कृतवाचनमाला । (१)
२) संस्कृतवाचनमाला । (२)
३) संस्कृतवाचनमाला । (३)
४) संस्कृतवाचनमाला । (४)
५) संस्कृत-भाषा-दर्पण:।


संस्कृतवाग्विलासः ।
विद्यालय-महाविद्यालय-विद्यार्थी-जनोपयोगी ।
संस्कृत-साहित्य-जिज्ञासु-जनोपयोगी ।
सङ्कलकः
कै. श्री. ग. वा. करंदीकर
प्रकाशक :
संस्कृतभाषासंस्था
मूल्यम् १२० रुप्यकाणि ।


गीर्वाणसरित् । (१)
(पञ्चमी - इयत्ता - कृते संस्कृतपुस्तकम् ।)


गीर्वाणसरित् । (२)
(षष्ठी - इयत्ता - कृते संस्कृतपुस्तकम् ।)


गीर्वाणसरित् । (३)
(सप्तमी - इयत्ता - कृते संस्कृतपुस्तकम् ।)